मनूला पुन्हा पदकाची संधी

सरबज्योतच्या साथीने कांस्य लढतीसाठी पात्र; रमिता अपयशी; बबुता चौथ्या स्थानी

वृत्तसंस्था, चॅटॅरॉक्स

पॅरिस ऑलिम्पिकमधील भाराताचे पदकाचे खाते उघडणाऱ्या मनू भाकरला आपली दर्जेदार कामगिरी सुरू ठेवण्यात यश आले आहे. अन्य नेमबाज पदकापासून दूर राहिले असताना, मनूने पुन्हा पदकाची संधी निर्माण केली आहे. १० मीटर एअर पिस्तूल प्रकाराच्या मिश्र सांघिक गटात मनूने सरबज्योत सिंगच्या साथीने खेळताना पात्रता फेरीत तिसरे स्थान मिळवले. त्यामुळे ही जोडी आज, मंगळवारी कांस्यपदकाची लढत खेळणार आहे.

दरम्यान, १० मीटर एअर रायफल स्पर्धा प्रकाराच्या वैयक्तिक गटात अंतिम फेरी गाठणाऱ्या अर्जुन बबुता आणि रमिता जिंदाल यांना पदकापर्यंत पोहोचण्यात अपयश आले. महिलांमध्ये रमिता सातव्या, तर पुरुषांमध्ये बुबता चौथ्या स्थानावर राहिला.

भारताची पहिली महिला ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज ठरलेल्या मनूने आपली लय सोमवारी कायम राखली. सरबज्योतच्या साथीत मनूने १० मीटर पिस्तूल प्रकारात ५८० गुणांसह तिसरे स्थान पटकावून कांस्यपदकाच्या लढतीत खेळण्याची पात्रता मिळवली. रिदम सांगवान आणि अर्जुनसिंग चीमा या अन्य भारतीय जोडीला मात्र अपयश आले. रिदम-अर्जुन जोडीला ५७६ गुणांसह १०व्या स्थानावर समाधान मानावे लागले.

तुर्कीच्या जोडीने ५८२ गुणांच्या ऑलिम्पिक विक्रमाची बरोबरी करताना पहिला क्रमांक मिळवला. सुवर्णपदकासाठी त्यांची गाठ दुसऱ्या स्थानावरील सर्बियाशी (५८१) पडणार आहे. मनू-सरबज्योत जोडी तिसऱ्या स्थानावर राहिली. चौथे स्थान कोरियाच्या ओ ये जिन आणि ली वोंहो जोडीने मिळवले. कांस्यपदकाची लढत या दोन जोड्यांमध्ये होईल.

बबुताला पदकाची हुलकावणी

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात अर्जुन बबुता पदकापासून वंचित राहिला. बबुताने

१०.७ गुणांसह अप्रतिम सुरुवात केली होती. त्यानंतर अचूक वेध साधत दुसरे स्थान कायम राखले होते. तो जागतिक विक्रमवीर शेंग लिहाओपासून केवळ ०.१ गुणाने पिछाडीवर होता. मात्र, यानंतर बबुता लय राखू शकला नाही. अखेर त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. लिहाओ (२५२.२ गुण) ऑलिम्पिक विक्रमासह सुवर्णपदकाचा मानकरी ठरला.

रमिताकडून निराशा

महिलांच्या अंतिम फेरीत रमिता १४५.३ गुणांसह सातव्या स्थानावर राहिली. रमिताने सुरुवात चांगली

केली, पण नेमबाज बाद होण्यास सुरुवात झाली तेव्हा रमिता १०४ गुणांसह सातव्या स्थानावर होती. सर्वप्रथम बाहेर पडण्याचा धोका असताना रमिताने १०.५ गुणांचा वेध घेतला. त्या वेळी नॉर्वेची हेग जीनेट ड्युस्टॅड बाहेर पडली. मात्र, त्यानंतर रमिताला खेळ उंचावण्यात अपयश आले. रमिता एका क्षणी चौथ्या स्थानावर होती. त्यानंतर मात्र अन्य प्रतिस्पर्ध्यांपेक्षा ती बरीच मागे पडली.

हरमनप्रीतच तारणहार!

हॉकीत भारताची अर्जेंटिनाशी बरोबरी

पॅरिस : सलग दुसऱ्या सामन्यात पिछाडीवर राहिल्यानंतर पुन्हा एकदा कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या गोलमुळे भारतीय पुरुष हॉकी संघाला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये हार टाळता आली. भारताने सोमवारी अर्जेंटिनाला १-१ असे बरोबरीत रोखले.

न्यूझीलंडविरुद्ध दोन मिनिटे शिल्लक असताना पेनल्टी स्ट्रोकवर विजयी गोल करणाऱ्या हरमनप्रीतने या वेळी दोन मिनिटे शिल्लक असतानाच पेनल्टी कॉर्नरवर गोल करून भारताला बरोबरी साधून दिली. या लढतीत हार वाचवण्यात यश आले असले, तरी पेनल्टी कॉर्नरवर सातत्याने गोल करण्यात येणाऱ्या अपयशाची भारताची डोकेदुखी कायम राहिली. भारताला सामन्यात तब्बल नऊ कॉर्नर मिळाले, ज्यापैकी एकच ते सत्कारणी लावू शकले. त्याच वेळी अर्जेंटिनाला ३६व्या मिनिटाला मिळालेला पेनल्टी स्ट्रोक दडवल्याची खंत निश्चित वाटत असेल. मायको कॅसेलाला भारताचा अनुभवी गोलरक्षक आर. श्रीजेशला चकवा देण्यात अपयश आले. त्याआधी सामन्याच्या २२व्या मिनिटाला लुकास मार्टिनेझने मैदानी गोल करून अर्जेंटिनाला आघाडीवर नेले होते.

लक्ष्य सेनचा 'पहिला विजय'

पॅरिस : पहिला सामना ग्राह्य न धरण्यात आल्याची निराशा मागे सोडत भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने सोमवारी बेल्जियमच्या ज्युलियन कॅरागिवर २१-१९, २१-१४ असा विजय मिळवला.

लक्ष्यने दोन दिवसांपूर्वी ऑलिम्पिक पदार्पणातील पहिल्या सामन्यात केव्हिन कॉर्डनला नमवले होते. मात्र, कोपराच्या दुखापतीमुळे कॉर्डनने स्पर्धेतून माघार घेतल्यामुळे लक्ष्यचा विजय स्पर्धा कार्यक्रमातूनच वगळण्यात आला. या गटातील अन्य दोन खेळाडूंना कॉर्डनविरुद्ध खेळण्याची संधी मिळणार नसल्याने हा सामना 'डिलीट' करण्यात आल्याचे सांगितले गेले. त्यामुळे कॅरागिविरुद्धचा सामना लक्ष्यचा अधिकृतरीत्या पहिला सामना आणि पहिला विजय ठरला.

पुरुष दुहेरीत सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीचा उपांत्यपूर्व फेरीतील प्रवेश निश्चित झाला. महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिशा क्रॅस्टोला सलग दुसरा पराभव पत्करावा लागला.

जगातील निम्मे डिजिटल व्यवहार भारतात

रिझर्व्ह बँकेच्या अहवालात वाढत्या सायबर धोक्यांचाही वेध

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: जगातील डिजिटल व्यवहारांमध्ये भारताचा वाटा तब्बल ४८.५ टक्क्यांवर पोहोचला असून, २०२६ मध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनांत डिजिटल अर्थव्यवस्थेचा वाटा सध्या एक दशांशावरून, एक-पंचमांश असा दुपटीने वाढण्याचा आश्वासक अंदाज सोमवारी प्रसिद्ध झालेल्या रिझर्व्ह बँखेच्या अहवालाने व्यक्त केला.

जगभरातून परदेशस्थ भारतीयांनी मायदेशी पैसे पाठविण्याचे प्रमाण भारतात सर्वाधिक असून, २०२३ मध्ये ही रक्कम ११५.३ अब्ज डॉलर असल्याचे रिझर्व्ह बँकेच्या चलन आणि वित्त अहवालातून समोर आले आहे.

अहवालानुसार, जगातील डिजिटल व्यवहारांतील ४८.५ टक्के वाट्यासह भारत आघाडीवर आहेत. मोबाईल आणि डिजिटल मंचाच्या माध्यमातून जागतिक पातळीवरून मायदेशी पैसे पाठविण्याचे प्रमाण वाढले असून, २०२३ मध्ये ही रक्कम ८५७.३ अब्ज डॉलरवर गेली आहे. भारत त्यात ११५ अब्ज डॉलरसह आघाडीवर आहे. सध्या भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (जीडीपी) डिजिटल अर्थव्यवस्थेचे प्रमाण एक दशांश आहे. मागील दशकभरातील वाढीचा विचार करता हे प्रमाण २०२६ पर्यंत एक पंचमांशांपर्यंत वाढेल.

डिजिटल क्रांतीमध्ये जागतिक अग्रणी म्हणून भारताचे स्थान असल्याचे अहवालात म्हटले आहे. गेल्या सात वर्षांत डिजिटल व्यवहारांतील वार्षिक वाढीचा दर संख्येच्या बाबतीत ५० टक्के आणि मूल्याच्या बाबतीत १० टक्के नोंदविण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ४२८ लाख कोटी रुपयांचे १६४ अब्ज व्यवहार झाले. डिजिटल स्थित्यंतरात भारताने केवळ वित्तीय नवतंत्रज्ञानाचा स्वीकार केलेला नसून, बायोमेट्रिक ओळख, युनिफाईड पेमेंट इंटरफेस, मोबाईल संपर्क यंत्रणा, डिजिलॉकर आणि संमतीसह विदा हस्तांतरण या सर्वच बाबींचा स्वीकार केलेला आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

> बँकिंग पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणालीतील डिजिटल स्थित्यंतराने, थेट लाभ हस्तांतरण आणि कर संकलन या दोन्हींचाही समावेश केला आहे. जोमदार ई-बाजारपेठ उदयास येत आहे आणि ती तिचा आवाका आणि व्याप उत्तरोत्तर वाढवत आहे.
>
> – **शक्तिकांत दास**, रिझर्व्ह बँकेच्या अहवालातील प्रस्तावनेत

सारस्वत बँकेचा एकूण व्यवसाय ८२,००० कोटींवर, ५०३ कोटींचा निव्वळ नफा

मुंबई: देशातील सहकार क्षेत्रातील सर्वात मोठ्या सारस्वत बँकेने तिच्या १०६ वर्षांच्या इतिहासातील आणि नागरी सहकारी बँकांच्या इतिहासातील देखील सर्वाधिक ५०२.९९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा सरलेल्या २०२३-२४ आर्थिक वर्षात नोंदवला. बँकेची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (२७ जुलै) दादरमध्ये पार पडली, त्याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर यांनी बँकेने एकूण व्यवसायात ८२,००० कोटींचा टप्पा पार केल्याचेही स्पष्ट केले.

'फेड'च्या धोरणदिशेपूर्वी सावधगिरी; सेन्सेक्स-निफ्टीत

मुंबई: अमेरिकेची मध्यवर्ती बँक - फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात कपातीबाबत नेमका कल काय, याबाबत साशंकतेसह, वाढलेल्या अस्थिरतेत गुंतवणूकदारांनी नफावसुलीला प्राधान्य दिले आणि त्या परिणामी सोमवारी सप्ताहारंभी विक्रमी उच्चांकी झेपावलेले सेन्सेक्स-निफ्टी हे प्रमुख निर्देशांक बाजार बंद होताना केवळ नाममात्र वाढ दर्शवत बंद झाले.

भांडवली बाजारात झालेल्या नफावसुलीचा मुख्यतः ग्राहकोपयोगी उत्पादने आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राला फटका बसला. दिवसअखेरीस केवळ २३.१२ अंश वाढीसह ८१,३३५.८४ या पातळीवर स्थिरावलेल्या 'सेन्सेक्स'मधील ३० पैकी १६ समभागांचे मूल्य वाढले, तर १४ समभागांचे मूल्य घसरले. दुसरीकडे निफ्टी निर्देशांक अवघ्या १.२५ अंशाच्या वाढीसह २४,८३६.१० पातळीवर सत्राअखेरीस स्थिरावला. सत्राच्या पूर्वार्धात मात्र सेन्सेक्स ५७५.७१ अंशांच्या कमाईसह ८१,९०८.४३ या सार्वकालिक उच्चांकपदी पोहोचला होता. निफ्टीनेही १६४.९ अंशांच्या मुसंडीसह २५ हजारांच्या समीप २४,९९९.७५ पर्यंत मजल मारली होती. मात्र समभाग विकून नफा पदरी बांधून घेणे गुंतवणूकदारांनी पसंत केल्याने, निर्देशांकांना दिवसातील हा उच्चांकी स्तर सांभाळता आला नाही.

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd. ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय:कोहिनूर स्क्वेयर, सत्तेचाळीसावा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी.गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई - 400028. संपर्क क्र. - 9773406175

अचल मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना [नियम 8(6) ची तरतूद पाहावी]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे कर्जदार दिनेश नरोत्तम बारापत्रे, सह-कर्जदार नरोत्तम बारापत्रे, राजेश नरोत्तम बारापत्रे, इंदिरा नरोत्तम बारापत्रे आणि प्रशांत एन बारापत्रे आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भाग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या मालमत्तेचा ओमकारा एआरसी च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दि. 09.02.2024 रोजी प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे. खाली वर्णन केलेली मालमत्ता ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आणि कोणताही पर्याय नाही या तत्वावर दि 03.07.2020 रोजी नुसार **रु. 44,84,248.14/- (रुपये चौरेचाळीस लक्ष चौऱ्याऐंशी हजार दोनशे अठ्ठेचाळीस आणि चौदा पैसे फक्त)** अधिक कंत्राटी दराने जमा झालेले व्याज / वसूल न केलेल्या व्याजासह शुल्के, खर्च व अधिभार इत्या. इतक्या रकमेच्या वसूलीसाठी **30.08.2024** रोजी सका. 11.00 वाजता (बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक आणि वेळ **दि. 29.08.2024** रोजी सायं 6.00 वाजेपर्यंत) पुढे, ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओमकारा पीएस 33/2020-21 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) यांनी **दि. 30.03.2024** रोजीच्या अभिहस्तांकन एडेलवाईज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (ईएचएफएल) यांचेकडून खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकी कर्जे त्यांच्यामधील अंतर्निहित अनामतींसह अधिग्रहित केली आहेत. त्यामुळे,ओएआरपीएल यांनी अभिहस्तांकनकर्त्यांची जागा घेतलेली आहे. सदर अभिहस्तांकनाच्या योगे ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ईएचएफएल) यांना थकबाकीची वसुली करण्याचा आणि अनामतीवर कारवाई करण्याचा अधिकार आहे.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत, बयाणा रक्कम, आणि ज्ञात असलेले बोजे (असल्यास) पुढील प्रमाणे आहेतः

मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम
मालमत्ता ब्लॉक क्र. 01-7एफएल, दुकान क्र. 07, क्षेत्रफळ सुमारे 405.91 चौ.फू., पहिला मजला, मनोरमा टॉवर, महानगर पालिका घर क्र. 995, 996, 998 आणि 999, वॉर्ड क्र. 44, भारतमाता स्क्वेअर, शनि मंदिर जवळ, बुधवारी, मौजा-नागपूर, शीट क्र. 140, सीटीएस क्र. 154 आणि 156, तहसील आणि जिल्हा नागपूर - 440002, उत्तरेस- सीटीएस क्र. 147 आणि 148, दक्षिणेस- सीटीएस क्र. 155, 153, 152, 151, 150, पूर्वेस- सीटीएस क्र. 118 आणि 153, पश्चिमेस- रस्ता आणि सीटीएस क्र. 155. **(बोली वृद्धी: रु. 50,000/-)**	**रु. 61,00,000/-**	**रु. 6,10,000/-**

ई-लिलाव दिनांक: 30.08.2024 रोजी सका. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत

सहभागाचे बोली पत्र / केवायसी दस्तावेज / बयाणा रकमेचा पुरावा सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ: 29.08.2024 रोजी सायं. 6:00 पर्यंत

पाहणी दिनांक: 23.08.2024 रोजी दु. 01.00 ते दु. 04.00 पर्यंत

ज्ञात दायित्वे: ज्ञात नाही

सदर प्रकाशन हे सिक्युरिटी इंटरेस्ट (एंफोरसमेंट) रूल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदारांसाठी तीस दिवसांची सूचनाही आहे.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया सुरक्षित धनकोची वेबसाईट http://omkaraarc.com/auction.php येथे दिलेली लिंक पाहावी. तसेच अधिक माहितीसाठी प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. 9773406175 आणि राजेंद्र देवरडे - 9324546651 आणि ईमेल- pratiksha.patel@omkaraarc.com यांच्याशी संपर्क करा किंवा सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा.ली. यांचेशी, टेलि. हेल्पलाईन: +91-7291981124/25/26, हेल्पलाइन ईमेल आयडी: support@bankeauctions.com, श्री. भाविक पांड्या, मोबाइल: 8866682937, ईमेल- Maharashtra@c1india.com यांच्याशी संपर्क करा. इच्छुक बोलीदार नादारी व दिवाळखोरी संहिता 2016 मधील अनुच्छेद 29ए अंतर्गत घोषणापत्र सादर करून त्याचे पालन करण्यास बांधील असतील.

दिनांक: 29.07.2024
स्थान: नागपूर

स्वा/-प्राधिकृत अधिकारी,
(प्रतीक्षा पटेल)
ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस 33/2021-22 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)

बैंक ऑफ़ इंडिया *रिश्तों की जमापूँजी*

आंचलिक कार्यालय : नागपुर अंचल
तिसरी मंजिल,सीएसडी,बैंक ऑफ इंडिया बिल्डींग,एस.व्ही.पटेल मार्ग,नागपुर-440001
☎ 0712-2544884
E-mail:nagpur.Admin@bankofindia.co.in

बैंक ऑफ इंडिया, दाभा शाखा, जिला नागपुर हेतु परिसर की आवश्यकता

दाभा के आस पास, जिला नागपुर स्थित तैयार उपलब्ध परिसर को 15 वर्ष या उससे अधिक की दीर्घावधि आधार पर किराये पर देने हेतु इच्छुक पार्टियों से क्रमशः तकनीकी बोली एवं वित्तीय बोली वाले दो अलग अलग सीलबंद लिफाफों में प्रस्ताव आमंत्रित किया जाता है। परिसर का कारपेट एरिया **लगभग 1800 स्केयर फीट** होना चाहिए। जिसमें ई-गॅलरी (एटीएम, नकद जमा मशीन, पासबुक कियोस्क) शामिल है।

यह प्रस्ताव बैंक के निर्धारित प्रारुप में ही होना चाहिए, जिसे आप **बैंक ऑफ इंडिया, नागपुर आंचलिक कार्यालय, सीएसडी, तीसरी मंजिल, एस.व्ही.पटेल मार्ग, नागपुर-440001 से दिनांक 18.07.2024 शाम 5.00 बजे** तक प्राप्त कर सकत है। निविदा दस्तावेज हमारे बैंक की वेबसाईट www.bankofindia.co.in से भी डाऊनलोड किया जा सकता है। निविदा जमा करने की अंतिम तिथी **07.08.2024 शाम 5.00 बजे** तक रहेगी। बैंक के पास बिना किसी कारण बताए किसी भी वजह से इस प्रस्ताव के किसी भाग या संपूर्ण प्रस्ताव को स्विकार/निरस्त करने का अधिकार सुरक्षित है। बैंक द्वारा किसी भी प्रकार का कोई ब्रोकरेज नहीं दिया जाएगा और किसी भी विसंगति की स्थिती में अंग्रेजी पाठ ही मान्य होगा।

आंचलिक प्रबंधक, नागपुर अंचल

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

शुद्धिपत्र

बैंक ऑफ बडोदा
झोनल स्ट्रेस्ड ॲसेट्स, रिकव्हरी शाखा पुणे, पहिला मजला, अतुर चेंबर्स, २, मोलेदिना रोड, पुणे-कॅम्प, महाराष्ट्र ४११००१.

सार्वजनिकरित्या सावधगिरीची सूचना आहे की अधिकृत अधिकारी बँक ऑफ बडोदा, झेडओएसएआरबी पुणे यांनी जारी केलेली **ई-लिलाव विक्री सूचना २७ जुलै, २०२४** रोजी लोकसत्ता नागपूर आवृत्तीमध्ये प्रकाशित झाली ज्यामध्ये **अ.क्र. १० ते १२** स्टँडवर नमूद केलेली मालमत्ता मागे घेण्यात आली आहे. वरील विक्री सूचनेतील उरलेली मालमत्ता जशी आहे तशीच मानली जाईल.

प्राधिकृत अधिकारी,
दि. ३०.०७.२०२४ बँक ऑफ बडोदा करिता

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

कॉर्पोरेट कार्यालय: ग्रेप गार्डन, थर्ड ''ए'' क्रॉस, 18वा मेन, सहावा ब्लॉक, कोरामंगला, बेंगळूरू 560095, कर्नाटक
क्षेत्रीय कार्यालय: सातवा मजला, अलमॉंटे आयटी पार्क, स.क्र. 8, खराडी-मुंढवा बायपास, खराडी गाव, पुणे - 411014.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9 च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. कर्जदार आणि आम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की खाली नमूद खात्यामधील तारण मालमत्तेचा बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद दिनांकास **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे''** तत्त्वावर जाहीर लिलाव करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र. / शाखा	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / गहाणकाराचे नाव	13(2) मागणी सूचना / या दिनांकास थकबाकी रक्कम (रु. मध्ये)	ताबा दिनांक	आरक्षित किंमत / बयाणा रक्कम रु. मध्ये
1	4496210130000008 / 4496-C A ROAD	**1) सोहेल शकील अहमद,** द्वारे, शेख जमील, राहणार, प्लॉट क्र. 48, खिरड लेआउट, मलकापूर, नागपूर, महाराष्ट्र - 440030. **2) रईस अहमद शकील अहमद,** स्टेट बँकच्या मागे, शिवाजी नगर, बानोसा, दर्यापूर, अमरावती, महाराष्ट्र - 444803.	04.02.2020 / Rs. 18,09,874/- as on 03.02.2020	22.06.2023	Rs.16,26,000/- / Rs.1,62,600/-

अचल मालमत्तेचे वर्णन: प्लॉट क्र. 7 व 7ए, क्षेत्रफळ सुमारे 2750 चौ.फू., मौजा मानकापूर, प.ह.न. 11, शीट क्र. 18, सिटी सर्वे क्र. 82/1, ख.क्र. 34/1, महापालिका घर क्र. 1349ए+7ए, वॉर्ड क्र. 61, कोराडी, तहसील जिल्हा नागपूर, सोबत तेथील संपूर्ण आरसीसी बांधकाम असलेली सदनिका क्र. 104, क्षेत्रफळ सुमारे 454.73 चौ.फू., पहिला मजला, नर्गिस अपार्टमेंट, तहसील व जिल्हा नागपूर, सिटी सर्वे क्र. 1049, शीट क्र. 29, 23, युनिट क्र. एलजी85, खालचा तळ क्षेत्रफळ सुमारे 9.476 चौ.मी., नामपा व नासुप्र च्या हद्दीत, उप-निबंधक नागपूर तालुका व जिल्हा नागपूर च्या अधिकार-क्षेत्रात.

मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक व वेळ : 02-08-2024 व 09-08-2024 स. 11 ते दु. 2 वाजेपर्यंत
बोली व बयाणा रक्कम सादरीकरणाचा दिनांक : 19-08-2024, स. 11 ते सायं. 5 वाजेपर्यंत
लिलावाचा दिनांक व वेळ : 20-08-2024, स. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत

बयाणा रक्कम रु. (''उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.'' यांचे नावे डिमांड ड्राफ्टच्या माध्यमातून भरण्यात यावी),
बोली सादरीकरणाचे स्थान: 1) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., केसर विला,सत्यामी प्रीसिंक्ट लेआउट, आंबेडकर चौकाजवळ, सेन्ट्रल अव्हेन्यू रोड, नागपूर 440008.
(संपर्क तपशील: धीरज रणगाडे - 9518554688, शिवाजी खाडे - 7058080915)

अटी व शर्ती: ई-लिलाव **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर घेण्यात येईल.

1. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्याअगोदर बोजे, लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेचा मालकी हक्क, आणि मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे / अधिकार / थकबाकी इ. बाबत स्वतः चौकशी करावी. सदर ई-लिलाव जाहिरात बँकेकडून देण्यात येणारे वचन किंवा त्यांचे प्रतिनिधित्व नसून तसे समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची विक्री बँकेस ज्ञात व अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. तिसऱ्या पक्षाने काही दावे / अधिकार / थकबाकीची मागणी इ. केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको जबाबदार नसतील.
2. बोली सादर करण्याअगोदर मत्ता आणि विनिर्देशांची पाहणी करून स्वतःची खात्री करून घेण्याची जबाबदारी बोलीदाराची असेल. प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद करण्यात आलेल्या ठिकाणी इच्छुक बोलीदारांना लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणी करता येईल.
3. इच्छुक बोलीदारांनी खाली नमूद केल्यानुसार लिलावाच्या दिनांकाच्या एक दिवस अगोदर निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्याकडे बोली सादर कराव्यात.
4. सदर ई-लिलाव **उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक** चे मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार - **मे. सी1 इंडिया प्रा.लि., संपर्क व्यक्ती - प्रभाकरन एम. (मो.क्र. 7418281709)** यांचेद्वारे राबविण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी मालमत्तांच्या तपशीलासाठी **https://www.bankeauctions.com** किंवा **https://www.ujjivansfb.in/e-auctions** येथे भेट द्यावी आणि बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी **https://www.bankeauctions.com** या पोर्टलवर आपले नाव नोंदवावे आणि आपला युजर आयडी व पासवर्ड निःशुल्क प्राप्त करून घ्यावा. संभाव्य बोलीदार सेवा पुरवठादार **मे. सी1 इंडिया प्रा.लि.** यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात, हेल्पलाईन क्रमांक-7291918824, 25, 26, सपोर्ट ई-मेल आयडीः- **support@bankeauctions.com,** लिलाव पोर्टल - **https://www.bankeauctions.com.**
5. मालमत्तेची विक्री सर्वोच्च बोलीदार / प्रस्ताव रकमेस मालमत्तेची विक्री करण्यात येईल, परंतु त्यासाठी सुरक्षित धनको म्हणजे **उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.** यांनी बोली स्वीकारणे आवश्यक आहे. परंतु, आवश्यक वाटल्यास आपसांत बोली करण्याची परवानगी देण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना असेल. कुठलेही कारण न देता कोणताही प्रस्ताव / निविदा स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल.
6. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम विक्री रकमेचा काही भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी बोली किंमत स्वीकारल्यानंतर 24 तासांच्या आत तोवर भरलेली बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम यशस्वी बोलीदारास भरावी लागेल आणि उर्वरित 75% रकमेचा भरणा विक्रीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत किंवा अशा वाढीव कालावधीत करावा लागेल आणि कोणत्याही परिस्थितीत हा कालावधी लेखी मंजूर केल्यानुसार 3 महिन्यांहून अधिक नसावा आणि ही परवानगी देण्याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल. यशस्वी बोलीदाराने हा भरणा न केल्यास प्रस्तावदाराने तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्ता पुन्हा लिलावात काढण्यात येईल आणि अशी कसूर करणाऱ्या खरेदीदारास मालमत्ता / रकमेच्या संदर्भात कोणताही दावा / अधिकाराची मागणी करता येणार नाही.
7. सदर प्रकाशन अनपेक्षित घटना कलमाच्या अधीन आहे.
8. बोलीदारांनी स्वतःचे हित लक्षात घेता शेवटच्या क्षणी बोली देणे टाळावे कारण इंटरनेट काम न करणे / वीजपुरवठा खंडित होणे इ. सारखी बाब झाल्यास **उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक** किंवा सेवा पुरवठादार जबाबदार नसतील. अशी अप्रिय परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वीजपुरवठा बॅक-अप इ. सारखी आवश्यक ती व्यवस्था / पर्याय अवलंबावेत जेणेकरून त्यांना अशी परिस्थितीस बगल देत लिलावात यशस्वीपणे सहभागी होता येईल.

तारण मालमत्तांच्या घेण्यात येणार असलेल्या जाहीर लिलावाबाबत वर नमूद कर्जदार / जामीनदार / गहाणकार यांना देण्यात येणारी ही सूचनादेखील आहे.

स्थान: नागपूर, दिनांक: 30.07.2024
स्वा/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया Central Bank of Indian

क्षेत्रिय कार्यालय नागपूर **दुसरा मजला, ओरिएंटल बिल्डींग, एलआयसी चौक, कामठी रोड, नागपुर - 440 001.**
फोन - 0712 - 2532824 / 2527678 फॅक्स - 0712 2528915

परिशिष्ट IV - ताबा सुचना (अचल संपत्ती करीता)

ज्याअर्थी खालील सही करणा-यांनी सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फाइनांशियल ॲसेट्स ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002(54 चे 2002) च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 मधील नियम 3 सह वाचल्या जाणा-या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिक